## संपादकीय

### फुटीर आमदारांवर पक्षांतरबंदी कायदा लागू होणार का?

शिवसेनेतील महत्त्वाचे नेते आणि कॅबिनेट मंत्री एकनाथ शिंदे गुजरातमध्ये पोहोचले आहेत. एकनाथ शिंदे सध्या नॉट रिचेबल असून, सध्या ते सुरतमधील ली मेरिडिअन या हॉटेलमध्ये आहेत. एकनाथ शिंदे निकालानंतर सोमवारी रात्रीच गुजरातमध्ये गेले. गुजरातमध्ये एकनाथ शिंदे यांच्यासोबत शिवसेनेचे मंत्री काही आमदार असल्याचे समोर आलेले असतानाच राज्यातील काँग्रेसचेही ५ आमदार नॉट रिचेबर झाल्याने राजकारणात खळबळ माजली आहे.शिवसेनेचे सुरतला गेलेले शिष्टमंडळ शिंदेना व आमदारांना समजवण्यात यशस्वी होऊन परतण्याची शक्यता कमी दिसून येत असून भाजपने ऑफरेशन लोटसची खेळी भाजपने खेळल्याचे सर्व प्रकारावरुन दिसून येत आहे.त्यातच एकनाथ शिंदे हे मंत्रीपदाचा राजीनामा देत शिवसेनेला जय महाराष्ट्र सुध्दा करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मंत्री एकनाथ शिंदे यांनी समर्थक आमदारांसह सूरत गाठल्याने शिवसेना विधिमंडळ पक्षात फूट पडणार का, अशी चर्चा सुरु झाली. पक्षांतरबंदी कायद्यानुसार दोन तृतीयांश आमदारांनी पक्ष सोडला तरच पक्षांतरबंदी कायदानुसार हे आमदार अपात्र ठरू शकणार नाहीत. शिवसेनेचे सध्या ५५ आमदार असल्याने दोन तृतीयांश म्हणजेच ३६ आमदारांनी वेगळा गट स्थापन केला तरच हे आमदार पक्षांतरबंदी कायद्याच्या कक्षेत येणार नाहीत.

राजीव गांधी पंतप्रधान असताना घटना दुरुस्ती करण्यात आली. ती ५२वी घटना दुरुस्ती होती. १९८५ पासून देशात पक्षांतरबंदी कायदा लागू करण्यात आला. एकूण सदस्यसंख्येच्या एकतृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केल्यास ते पक्षांतर होत नाही, अशी मूळ कायद्यात तरतूद करण्यात आली होती.आमदारांच्या फाटाफुटीमुळे सरकारच्या स्थिरतेवर होणाऱ्या परिणामांना आळा घालण्याकरिता राजीव गांधी पंतप्रधान असताना पक्षांतरबंदी कायद्यात सुधारणा करण्यात आली होती. ५२व्या घटना दुरुस्तीनुसार एकूण सदस्यसंख्येच्या एक तृतीयांश खासदार आमदारांनी पक्षांतर केले, स्वतंत्र गट स्थापन केला तरच पक्षांतरबंदी कायद्याची तरतूद लागू होत नसे. पण ही तरतूद तेवढी प्रभावी ठरली नव्हती. कारण त्यानंतर काही सरकारे एक तृतीयांश आमदारांच्या पक्षांतरामुळे कोसळली होती.

मग अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात ९१व्या घटना दुरुस्तीनुसार विधिमंडळ किंवा संसदीय दलातील दोन तृतीयांश खासदार वा आमदारांनी पक्षांतर केले तर पक्षांतरबंदी कायद्याच्या कक्षेत ते येत नाही. यामुळे एकूण सदस्यसंख्येच्या दोन तृतीयांश आमदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला व अन्य पक्षात प्रवेश केला तरीही पक्षांतरबंदी कायद्याच्या कक्षेत येत नाही.दहाव्या परिशिष्टानुसार दोन तृतीयांश आमदारांनी पक्षांतर केले तरच ते वैध ठरते. म्हणजेच पक्षांतरबंदी कायद्यातून ते सहीसलामत बचावतील. अन्यथा या बंड करणाऱ्या आमदारांना सदस्यत्वपदाचा राजीनामा द्यावा लागेल. राजीनामे देऊन पुन्हा पोटनिवडणुकींना सामोरे जावे लागेल. कर्नाटकात काँग्रेस व धर्मनिरपेक्ष जनता दलाच्या आमदारांनी राजीनामे दिल्याने कुमारस्वामी यांचे सरकार कोसळले होते. पोटनिवडणुकांमध्ये हे आमदार पुन्हा निवडून आले आणि भाजपचे सरकार स्थिर झाले. मध्य प्रदेशातही ज्योतिरादित्य शिंदे यांच्याबरोबरील काँग्रेस आमदारांनी राजीनामे दिल्याने काँग्रेस सरकार गडगडले होते. नंतर हे आमदार पोटनिवडणुकांमध्ये निवडून आले.

### उत्तम आरोग्यासाठी योगा गरजेचा

पूर्वीच्या काळी "खेलोगे कुदोगे तो बनोगे खराब, पढोगे लिखोगे तो बनोगे नबाब' असे म्हटले जात असायचे. खेळाला नगण्य महत्त्व देत अभ्यासाला प्राधान्य दिले जायचे. त्यामुळे आपल्या देशामध्ये अभ्यासू मंडळी ज्याच्या त्याच्या बुद्धीच्या क्षमतेनुसार शिक्षण घेत गेली. शिक्षण उदरनिर्वाहासाठी आवश्यक असल्याचे बालवयापासूनच मनावर बिंबविले जात होते. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत क्रीडा क्षेत्रामध्ये आपल्या देशाची पिछेहाट होत गेली. आशियाई तसेच राष्ट्रकुल स्पर्धामध्ये एक-दोन पदके मिळविण्यापुरते आपल्या देशाचे अस्तित्व दिसत असले तरी ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये अलीकडच्या काळातील काही अपवाद वगळता आपल्या देशाचा खातेफलक कोराच असायचा.

आपल्या तुलनेत लोकसंख्येने व क्षेत्रफळाने कमी आकारमान असलेले देश मात्र पदकतालिकेत गर्भश्रीमंती मानाने व सन्मानाने फिरविताना दिसून यायचे; परंतु अलीकडच्या काळात क्रीडा क्षेत्रात मिळणारा पैसा पाहून पालकच आता आपल्या मुलांना क्रीडा क्षेत्राकडे वळण्याचा आग्रह धरू लागले आहेत. सुदृढ शरीरासाठी उत्तम आरोग्य आवश्यक आहे. रुषीमुनींच्या काळापासून, आश्रम शिक्षणप्रणाली असल्यापासून गुरुकुलातील विद्यार्थ्यांना योगाचे शिक्षण दिले जात असे; परंतु कालांतराने आपणास त्याचा विसर पडला. शरीर स्वास्थ्यासाठी योगा आवश्यक असतानाही भारतीयांचा योगाकडे काणाडोळा होत गेला. शरीर स्वास्थ्याचे महत्त्व आपणाला उशिराने का होईना लक्षात आल्याने आता पदकतालिकेत आपले अस्तित्व ठळकपणे पाहावयास मिळत आहे.शरीर स्वास्थ्यासाठी व आरोग्य हितासाठी योगाचे महत्त्व कोणाच्या लक्षात येऊ नये किंवा योगाचे गांभीर्य कोणाला समजू नये ही खरोखरीच शोकांतिकाच आहे;

## जातगणनेच्या पडद्यामागील सत्य!




शेकडो वर्षांचा इतिहास लाभलेल्या जातगणनेच्या मुद्दयावर केंद्रसरकारने सर्वोच्च न्यायालयाला प्रतिज्ञापत्र लिहून दिल्यापासून सध्या देशभरातील जनता संभ्रमावस्थेत आहे. कारण त्या प्रतिज्ञापत्रात जनगणनेबाबत नेमकं काय लिहिले आहे याचे आकलन होत नसल्याने आपले मायबाप सरकार वा लोकप्रतिनिधी सामान्य जनतेला जोपर्यंत पटवून देत नाही तोपर्यत जनतेमध्ये ही अवस्था कायम राहणार आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. भविष्यात जनभावनांचा उद्रेक होऊ नये व दशवार्षिक जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यक्रमाला गालबोट लागू नये यासाठी अशा जबाबदार घटकांनी जनभावनांचा आदर म्हणून यावर वेळीच उपाययोजना करावी. अन्यथा संभाव्य परिणामांची जबाबदारी इतरांवर ढकलून आपण अलिप्त राहू हा विचार आपणासाठी व देशासाठी सुद्धा घातक ठरू शकतो हे समजून घेण्यातच शहाणपणा आहे.

ब्रिटिशकालीन भारतात १८७२ पासून १९३१ पर्यंत जातवार जनगणना झाल्याचा इतिहास जगजाहीर आहे. १९४१ ला जातवार गणना झाली, परंतु अहवाल प्रसिद्ध करता आला नाही. पुढे स्वतंत्र भारतात सेन्सस ॲक्ट १९४८ अन्वये १९५१ ला पहिली जातवार जनगणना झाली, परंतु त्यात केवळ शेड्युल मधल्या जातींची म्हणजे अनु. जाती-जमातींची जातवार माहिती गोळा करण्यात आली. मग त्यासोबतच इतर जातींची जातवार माहिती का गोळा करण्यात आली नाही हे कोडं आजपर्यंत उलगडलेलं नाही. म्हणजे ७० वर्षापुर्वी काँग्रेसने झाकून ठेवलेलं सत्य भाजपाने सुद्धा आजही झाकूनच ठेवलं आहे. यामागे दोन्ही पक्षांचा हेतू कोणता असावा? दोन्ही पक्षातील कोणत्या सजातीय नेत्यांच्या डोक्यातील ही विषवल्ली असावी? की आपल्या सत्तेला धोका ठरू शकणाऱ्या देशातील सर्वाधिक संख्येच्या ओबीसीला टार्गेट करून दोन्ही पक्षांनी मिळून हा कट रचला असावा? तसं असेल तर या कटाचा तपास करून सत्य बाहेर काढण्यात ओबीसींचे नेते कमी पडत आहेत काय? आणि जर हे खरं असेल तर मग ओबीसींचा मसिहा व्ही.पी.सिंग सारखा एखादा बिगरओबीसी लढवय्या नेता ओबीसींनी कां शोधू नये यावर चिंतन होण्याची गरज आहे.

वास्तविकता ही आहे की सामाजिक विषमतेमुळे मागास राहिलेल्या जातसमुहाचे दर १० वर्षांनी सर्वेक्षण करून व त्यानुसार धोरण व योजना प्रत्यक्ष राबवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची संविधानिक जबाबदारी पार पाडू अशी राज्यकर्त्यांनी शपथ घेतली होती. परंतु त्यांनी त्या शपथेचा वेळोवेळी भंग करून जनतेचा विश्वासघातच केला आहे.

खरंतर गेल्या ७० वर्षापासून जातगणनेची मागणी होत आहे. यामध्ये १९५५ ला कालेलकर आयोग, १९८० ला मंडल आयोग, १९९३ ला इंद्रासाहनी खंडपीठ, २००३ ला खासदार समिती, २००४ ला निच्चिपन आयोग, २००६ ला मानव संसाधन विकास विभाग, २००८ ला समता परिषद, रेणके आयोग, २०१० ला कृष्णमूर्ती खंडपीठ, २०२१ ला तेलंगना विकास परिषद, महाराष्ट्र विधानसभेचा ठराव, बिहार, झारखंड, ओरिसा, तामीलनाडु राज्यसरकार, २०२२ ला ॲड. क्रिष्णकनैय्या याचिका, बिहार सर्वपक्षीय ठराव याशिवाय ओबीसी-जात संघटना अशा विविध स्तरातून मागास जातींच्या वतीने जातगणनेची मागणी सातत्याने होत आहे. तथापी या सगळ्यांच्या भावना पायदळी तुडवून व तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंग यांच्या ओबीसी गणनेच्या आश्वासनानंतर सुद्धा केंद्रसरकार येणाऱ्या सेन्ससमध्ये जातगणना करणार नाही असे केंद्रीय गृहमंत्रालयाने घोषित केले. आणि लगेच सप्टेंबर २०२१ मध्ये केंद्रसरकारने सर्वोच्च न्यायालयात याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करून टाकले. अर्थात ते यापूर्वी २०१० मध्ये संघाने स्पष्ट केलेल्या धोरणानुसारच असण्याची शक्यता अधिक दिसते. सदर प्रतिज्ञापत्रात केंद्रसरकारने जातगणना न करण्यामागची कारणे सांगितली आहेत, त्याची सत्यता आपण तपासून पाहू शकता.

१) २०११ च्या ओबीसी जातगणनेत १९३१ च्या तुलनेत ४६ लाख जातींची भर पडल्यामुळे करोडो त्रुटी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे २०२१ च्या सेन्ससमध्ये जातवार गणना केल्यास प्रचंड त्रुटीसह तयार होणाऱ्या डेटाचे विश्लेषण करणे अत्यंत कठीण व जिकरीचे होईल. :-

यावरून अशी शंका येते की यामध्ये वापरण्यात आलेले मनुष्यबळ व तंत्रज्ञान सक्षम नव्हते. म्हणजे अशा नाकाम साधनांच्या सहाय्याने ओबीसीचा डेटा सदोषच बनणार हे सरकारला माहित नव्हते काय? बरं तेव्हा तो सदोष बनला म्हणजे पुढेही सदोषच बनणार हे तुम्ही आधीच कसे भाकित करता? बरं तो डेटा सदोष होता तर संसदीय समिती, सामाजिक न्यायविभाग व रोहिणी आयोगाला कसा दिला?

२)जातगणनेतून सदोष व निरूपयोगी डेटा मिळण्याची शक्यता असल्याने जातगणना करणे शक्य नाही. :-

खरेतर १९५१ पासून अनु. जाती/जमातीचा डेटा जातगणनेतुनच घेतल्या जात आहे. मग तो डेटा सदोष असल्याची कुठं नोंद आहे काय? बरं २०११ चा ओबीसी डेटा जातगणनेतून नव्हता तरीही तो सदोष झाला. मग जातगणनेतून डेटा सदोष मिळतो याला कुठला आधार आहे? तसा आधार नसेल तर हे हायपोथेसिस कुणाच्या मेंदुतून बाहेर आले याचा शोध घेण्याची गरज नाही काय?

३)अशा प्रचंड चुका व त्रुटीमुळे जनगणनेचे संपूर्ण काम सदोष होण्याचा धोका आहे. :-

इथं सर्वंकष जातगणना पहिल्यांदाच होणार असल्याने त्यात प्रचंड चुका होणार आहेत हे तुम्हाला आधीच कसे कळले? आणि चुका व त्रुटी असल्याही तरी त्या निस्तारणारी यंत्रणा डिजीटल इंडीया जवळ नाही यावर विश्वास कोण ठेवणार?

४) सदर सेन्ससाठी प्रश्नावली आधीच बनलेली असल्याने प्रपत्रात नवीन कॉलम टाकणे शक्य नाही.

:- असं असेल तर तज्ञ मनुष्यबळ व प्रगत तंत्रज्ञान वापरले तर हा प्रश्न सहज सुटू शकतो मात्र त्यासाठी सरकारकडे शुद्ध हेतू व प्रबळ इच्छाशक्ती पाहिजे.

५) अनु. जाती/जमाती व्यतिरिक्त इतर जातींची गणना करणे केंद्रसरकारवर घटनात्मक बंधन नाही. :-

घटनेच्या ३४० व्या कलमानुसारच ओबीसी प्रवर्ग निश्चित झाल्यामुळे विशिष्ट काळानंतर त्याच्या मागासलेपणाचे मोजमाप करणे हे घटनेला अभिप्रेत असल्यामुळे ओबीसीची जातगणना करण्याचे घटनात्मक बंधन सरकारवर आहे ते कसे नाकारणार?

६) जातगणना न करण्याचा सरकारचा धोरणात्मक निर्णय असल्याने न्यायालय सरकारला याबाबत आदेश देवू शकत नाही. :-

यामध्ये तो न्यायालयाचा आदेश नाही तर न्यायालयाने केंद्रसरकारला ओबीसीचा डेटा मागितला आहे जो सरकारकडे नाही! जिथं सरकारचे धोरणच लोकहिताविरूद्ध व घटनेविरूद्ध असेल तिथं सरकारचा निर्णय धोरणात्मक कसा राहू शकेल? आणि अशा निर्णयाबाबत न्यायालय सरकारला सूचना करू शकते.

याशिवाय जातगणनेमुळे भारत ग्लोबल बनणार नाही, जातीय गटबाजी वाढेल, द्वेष व शत्रुत्व वाढेल, हिंदुसमाज तुटेल , हिंदु-मुस्लिम संघर्ष तीव्र होईल, जातीला कायदेशीर मान्यता मिळेल व त्यातून जातवार आरक्षणाची मागणी समोर येऊन देशाला सांप्रदायिक संघर्षाचा धोका निर्माण होईल असे अतार्किक व निर्बुद्धपणाचे दावे करून जातगणनेला विरोध केल्या जात आहे. हा विरोध तसा जुनाच आहे. २०१० मध्ये जातगणनेच्या मुद्यावर भाजपातील एक गट संसदेत समर्थन करतो तर बाहेर संघपरिवार सर्व जातींच्या जातगणनेला नाहरकत प्रमाणपत्र देत असला तरी हिंदू समाज तुटेल या भितीने केवळ ओबीसींच्या स्वतंत्र जातगणनेला विरोध करतो. तर दुसरीकडे संघाचे सेक्रेटरी सुरेश जोशी म्हणतात, Caste Census is against a casteless society & it may spoil social harmony & unity. तात्पर्य एकाच मुद्यावर वेगवेगळी मते मांडून संघपरिवार सरकारमध्ये व जनतेमध्ये संभ्रमाची स्थिती कां निर्माण करतो? सगळ्या जाती मोजल्या तर हिंदूसमाज एकसंघ राहील पण केवळ ओबीसी जाती मोजल्या तर हिंदूसमाज तुटेल, संघाचा हा तर्क कशाच्या आधारावर आहे?

खरेतर ओबीसींच्या जाती मोजल्या तर त्यांना त्यांच्या सत्यस्थितीचे दर्शन होईल, स्वत:वर होत असलेला अन्याय पाहून तो खडबळून जागा होईल व धर्माची झापडं बाजूला फेकून आपल्या हक्कासाठी संघर्ष करेल आणि नेमकं हेच संघाला नको असावं. विशेष म्हणजे संघाच्या या तर्काला न जुमानता तत्कालीन केंद्रिय गृहमंत्री राजनाथसिंग यांनी २०२१ च्या सेन्ससमध्ये ओबीसींची गणना करण्याचे आश्वासन दिले होते आणि त्यासाठी त्यांना त्याची किंमतही मोजावी लागली. अशी हिंमत कोणत्या ओबीसी नेत्याने दाखविली? काही का असेना पण जनगणनेच्या प्रश्नावर सरकारपेक्षा संघाच्या मताला सध्या अधिक महत्व असल्याचे केंद्राच्या प्रतिज्ञापत्रावरून दिसून येते. वास्तविक जातीवर आधारीत जनगणना नकोच ! म्हणून टाहो फोडणाऱ्या महाभागांनी जातीच्या नावावर देशात सध्या काय सुरू आहे याकडे सुद्धा स्वच्छ मनाने बघितलं पाहिजे. यामध्ये, राजकीय पक्षांचे सेल, तिकीट वाटप, निवडणुक प्रचार, जातपंचायत, साहित्य व मिडियाचे फोकस, धार्मिक स्थळे-पुजारी-ट्रस्टी-स्नानघाट-येथील व्यवसाय, पुजा-होमहवन-विधी, धार्मिक संघटनांचे प्रमुख, साधू-महंत-मठाधिपती, आश्रम-प्रवचनकार-पुरोहित, मस्जिद-दर्गाचे प्रमुख, काजी, चर्च-गुरूद्वाराचे प्रमुख, जातसंघटना लग्नसंबंध, शासकीय दस्तावेजातील नोंदी, जन्ममृत्यू दाखले, योजना-आरक्षण-सवलती, वर्णव्यवस्था, उद्योगसाखळी, नोकरीतील पदभरती-बढती-रोष्टर, संसाधनाचे वाटप-मालकी, शालेय पटनोंदणी यासारखे कितीतरी कार्यक्रम जातीवर आधारीत सुरू असून सुद्धा त्यामुळे जर हिंदूसमाज तुटत नसेल तर जातगणनेमुळे कसा तुटतो? अरे धर्म मोजल्याने धर्म तुटत नसेल तर जात मोजल्याने समाज कसा तुटतो याचे स्पष्टीकरण हे महाभाग देऊ शकतील काय ? तात्पर्य जातगणना न करण्यामागील सरकारने दिलेली कारणे कायद्याच्या निकषावर व बुद्धीप्रामाण्यावर टिकू शकतील असे वाटत नाही. त्यामुळे अशा निराधार दाव्याच्या आधारे सरकार जातगणना कशी टाळू शकते? ज्या ओबीसीच्या कळपाने सरकार बसवलं त्याच कळपाच्या जीवावर हे सरकार उठलं असेल तर त्या कळपाने कुणाच्या गोठ्यात जायचं? की स्वत:चा गोठा बांधायचा? हे त्या कळपालाच ठरवू द्या.

विशेष म्हणजे ब्रिटिशांनी आमच्या जाती मोजल्या पण आपलीच माणसं आपल्याच जाती मोजण्यास तयार नाहीत. इथं भारतीय समाजाचा मूळ पाया जात हाच आहे जी आजही कायम आहे. म्हणूनच भारतात माणसाची जात सांगितल्याशिवाय त्याचा डेटा स्पष्ट होत नाही. त्यामुळेच ब्रिटिशांनी जातवार गणना करूनच धोरणे आखली. पण आपले सरकार १९५१ पासून नुसते डोकेच मोजत आहे. पण त्या डोक्यातली जात तशीच ठेवत आहे. म्हणजे जात न मोजताच धोरणे व योजना बनवित आहे, तेही मात्र ब्रिटिशांनी मोजलेल्या पण आता कालबाह्य झालेल्या १९३१ च्या जातगणनेवर ! म्हणजे धोरण व योजना उद्यासाठी पण त्याला आधार ९० वर्षापूर्वीचा! पटते काय? मग अशी धोरणे व योजना अचुक कशा बनतील ? तात्पर्य इथं चुकीच्या धोरणावर विकासाचे मॉडेल काम करीत असल्यामुळे देशाचा विकास विकृत झाला आहे. परिणामी आर्थिक दरी प्रचंड वाढली . Oxfam India Report - २०२० नुसार देशात १० टक्के लोकांकडे ७७ टक्के संपत्ती, ४० टक्के लोकांकडे २० टक्के संपत्ती व ५० टक्के लोकांकडे फक्त ३ टक्के संपत्ती असून अतिश्रीमंत लोकांच्या गणनेत ५० टक्के ब्राम्हण, ३१ टक्के राजपूत, ४४ टक्के बनिया, ५७ टक्के कायस्थ, १० टक्के दलीत, ५ टक्के आदिवासी, १६ टक्के ओबीसी व १७ टक्के मुस्लीम आहेत. याशिवाय ७७ टक्के पारसी, ७० टक्के जैन, ६० टक्के शीख, २९ टक्के ख्रिश्चन व २२ टक्के हिन्दू आहेत. यावरून देशात मोजके श्रीमंत तर बहुसंख्य गरीब आहेत. हा सत्ताधाऱ्यांनी राबविलेल्या चुकीच्या धोरणाचा परिणाम नाही काय? याउपर निवडणूक-राजकारण पैसाकेंद्रित बनले, शासन-प्रशासन मुजोर झाले तर जनता हतबल झाली. मग अशा हतबल जनतेला धर्माच्या नशेत बुडविले त्यामुळे ती अन्यायाचे भान हरपून गेली, प्रतिकार शक्ती गमावून बसली व परिणामी विकलांग बनली. म्हणजे स्वदेशी शासनकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे देशाचा ९० टक्के भाग विकलांग झाला ! तरीही गर्वसे कहो ! असे म्हणू-म्हणू तर देशाची ही अवस्था झाली ! आतातरी मायावी जगातुन बाहेर या नी वास्तव समजुन घ्या !

बरं मग जातगणना झाली तर काय होईल? संपूर्ण लोकसंख्येची जातगणना झाली तर प्रत्येक जातीची निश्चित संख्या कळेल, शिक्षण-नोकरी-रोजगारातील प्रतिनिधित्व कळेल, सामाजिक-आर्थिक स्थिती कळेल, देशाच्या संसाधनावर कुणाची किती मालकी, किती वाटा आहे ते कळेल, शिक्षण-नोकऱ्यातील जागा कुणी कुणाच्या किती हडप केल्या ते कळेल, सरकारच्या धोरणाचा कुणाला किती फायदा/तोटा झाला ते कळेल, जनतेची पर्यायाने देशाची संपत्ती लुटणारे व लुटू देणारे कोण ते कळेल, सामाजिक-आर्थिक विषमता व न्यायाचे वाटप कळेल व मग अन्यायाच्या विरोधात रस्त्यावर येऊन अन्यायग्रस्त जनता समान वाट्याची (इक्विटी शेअर) मागणी करतील जी जोतीराव फुलेंनी १५० वर्षापूर्वी केली होती. हा जनसंघर्ष जेव्हा देशभर पसरेल तेव्हा वरचे १० टक्के लोक एकत्र येऊन तो संघर्ष दाबण्याचा प्रयत्न करतील. जर हा संघर्ष त्यापलीकडे गेला तर सत्तांतर होईल मग नव्या सरकारला जनतेच्या दबावाखाली काम करावे लागेल. नवे कायदे येतील, शहरी संपत्ती-जमीन-फ्लॅट-सोने-बँकबॅलेन्स-लॉकर-मंदिर-मस्जिद-चर्च-आश्रम यातील अतिरिक्त संपत्तीवर सिलींग येईल व ती सरकारजमा होईल व मग गरिबांना समान वाटप होईल. आरक्षण मर्यादा काढून संख्येनुसार आरक्षण लागू होईल. धर्माच्या नावावर लुट थांबेल व धर्माला दुय्यम स्थान येऊन संविधानाला धर्मग्रंथापेक्षाही अधिक महत्व प्राप्त होईल. नवे राजकीय समीकरणे तयार होऊन उच्चजातीची सत्ता संपुष्टात येईल व बहुजनांची सत्ता प्रस्थापित होईल. मग खऱ्या अर्थाने समतेवर आधारीत बहुजन राष्ट्र निर्माण होईल, जिथं जातीनिर्मुलनाच्या प्रक्रियेला वेग येऊन जातीविरहीत समाज निर्माण होईल! म्हणुनच येत्या सेन्सस मध्ये जातगणना करण्यासाठी सरकारला भाग पाडण्यास आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे !

**प्रा. नामदेवराव जेंगठे**
**चंद्रपूर-जिल्हा ओबीसी संघटना**

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आदर्श आश्रमशाळा

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतात. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आदिवासी विकास विभागांर्तगत शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये या आश्रमशाळांची महत्त्वाची भूमिका असून आश्रमशाळांचे योगदानही उल्लेखनीय आहे. राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना आश्रमशाळेच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. आधुनिक काळातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी या शाळांमध्ये आमुलाग्र बदल केले जात आहेत.

आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल नामांकित शाळा योजना याअंतर्गत १ ली ते १२ वी पर्यतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शासकीय वसतिगृहे आणि स्वयंम योजनेअंतर्गत सहाय्य करण्यात येते. आदिवासी विकास विभागाच्या ४९७ निवासी आश्रमशाळांपैकी १२१ आश्रमशाळा या आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३० आश्रमशाळा ह्या आदर्श (मॉडेल) करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास सुरुवात झाली आहे.

आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याच्या अनुषंगाने प्रत्येक आदर्श आश्रमशाळेत महत्त्वाच्या बाबी व घटकांचा समावेश करण्यात येत आहे. यामध्ये आश्रमशाळेकरिता सुसज्ज शालेय इमारत असणार असून त्यामध्ये आयसीटी लॅब, सायन्स लॅब, ग्रंथालय, संगीत व कला कक्ष तसेच पुरेशी शौचालये, निवासी मुले व मुलींकरिता स्वतंत्र व सुसज्ज वसतिगृहाची इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था, प्रत्येक आदर्श आश्रमशाळेत सुसज्ज भोजनालय व बहुउद्देशीय सभागृह, अपंग विद्यार्थ्यांसाठी पुरेशा सोयी-सुविधांसह स्वतंत्र शौचालय, स्वच्छ व पुरेशा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुस्थितीत असलेले वर्ग खोल्या, आकर्षक इमारत, क्रीडांगण व क्रीडा साहित्य तसेच आदर्श आश्रमशाळेच्या परिसरात सर्व सोयी-सुविधांसह स्वतंत्र सीक रूम, सीसीटीव्ही कॅमेरे यांसारख्या भौतिक सुविधांचा समावेश केला आहे. अद्ययावत शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी डिजिटल क्लासरुम, व्हर्च्युअल क्लासरुम, लॅट लॅब, कॉम्प्युटर लॅब इत्यादी सुविधा असणार आहे.




आदर्श आश्रमशाळांमधून २१ व्या शतकातील कौशल्ये जसे की, नवनिर्मितीला चालना देणारे (Creative thinking), समिक्षात्मक विचार (Critical Thinking), वैज्ञानिक प्रवृत्ती (Scientific Temperament), संविधानिक मूल्ये अंगी बाणविणे, सोबत काम करण्याचे कौशल्य (Collaboration), संभाषण कौशल्य (Communication) या सारखी अन्य कौशल्ये जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांच्यामध्ये विकसित करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रत्येक आदर्श आश्रमशाळेमध्ये उत्तम शैक्षणिक पोषक वातावरण निर्माण करण्यात येणार आहे. आश्रमशाळेच्या ग्रंथालयामध्ये निरनिराळ्या गोष्टींची पूरक वाचनाची पुस्तके आणि संदर्भ ग्रंथ तसेच इनसायक्लोपिडिया उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. स्वयंअध्ययनासोबतच गट अध्ययन यासारखे रचनात्मक पद्धतीने शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये वाढ व्हावी यासाठी कृतियुक्त शिक्षणातून (Activity Based Learning) शिक्षण देण्यात येणार आहे. कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त विषयाचे शिक्षण अवगत करता यावे याकरिता विद्यार्थ्यांना रचनात्मक आनंददायी शिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना सध्याच्या स्पर्धात्मक युगात विविध आव्हानांना सामोरे जाण्याच्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी विविध विषयातील अध्ययन, भाषण, लेखन, अभिनय, गायन व अन्य शालेय उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

अमरावती, ठाणे, नाशिक आणि नागपूर या चारही अपर आयुक्त अंतर्गत निवड झालेल्या आश्रमशाळांची संख्या पुसद १, पांढरकवडा ६, किनवट ५, धारणी ४, कळमनुरी २, औरंगाबाद १, अकोला २, जव्हार ६, डहाणू ५, घोडेगाव १०, पेण ४, शहापूर २, धुळे ६, कळवण १६, नंदूरबार ७, नाशिक ९, राजूर ५, तळोदा १०, यावल १, भामरागड ३, अहेरी १, चंद्रपूर २, गडचिरोली ८, चिमूर १,नागपूर १, देवरी ३ अशी आहे.

कोरोना काळात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आदिवासी विकास विभागाने "अनलॉक लर्निंग" हा अभिनव उपक्रम राबविला. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, खाजगी नामांकित शाळांमध्ये शिकणाऱ्या मात्र लॉकडाऊनमुळे आदिवासी दुर्गम भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यापर्यंत ऑनलाईन शिक्षण पोहचविण्यासाठी स्मार्ट फोन व इंटरनेटची सुविधा काही वेळेस शक्य नव्हती. त्यामुळे शिक्षणाच्या मूलभूत संकल्पना अंमलात आणण्यासाठी नियोजन आराखडा तयार करण्यात आला. ज्या ठिकाणी ऑनलाईन शिक्षण पोहोचले नाही, तसेच शिक्षकही पोहोचू शकले नाहीत, तेथील विद्यार्थ्यांचा विचार करून हा एक वेगळा उपक्रम सुरू करण्यात आला. अशा भागातील/गावातील शिक्षक अथवा गावातीलच शिक्षित तरुणांना शालेय विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी तयार केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्यास मदत झाली.प्रशासकीय सेवांमध्ये अनुसूचित जमातीच्या तरुणांची टक्केवारी वाढावी यासाठी आदिवासी विकास विभागाने स्वतंत्र योजना आणली आहे. राज्यातील अनुसूचित जमातीच्या तरुणांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळावे, त्यांचा प्रशासनात सहभाग वाढावा, यासाठी सन २०२०-२१ या वर्षापासून प्रोत्साहनपर आर्थिक मदत देण्यात येत आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, प्रशासनात नोकरीची संधी मिळावी विभाग योजना व उपक्रम राबविते. आदर्श आश्रमशाळेच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आमूलाग्र बदल होणार असून आदिवासी विद्यार्थ्यांना भौतिक व शैक्षणिक सुविधांनी परिपूर्ण शिक्षण मिळणार आहे.

**शैलजा पाटील,**
**सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

## मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी योगा उपयुक्त-शिक्षणाधिकारी कादर शेख




**गोंदिया:** मानवी जीवनात सृदृढ, निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी तसेच मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी योगा नियमितपणे करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी जि. प. गोंदिया कादर शेख यांनी योगा दिनाच्या उद्घाटन प्रसंगी केले. योग दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग असे जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले आहे. सर्वप्रथम प्रमुख अतिथीच्या हस्ते दीप प्रज्वलीत करून आंतरराष्ट्रीय योग दिनाचे उद्घाटन करण्यात आले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, प्रशासन, नेहरू युवा केंद्र, भारत स्कॉउट्स गाईड, अखिल भारतीय योगशिक्षक महासंघ व जिल्हयातील विविध संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जुन २०२२ हा दिवस आठवा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन जिल्हा क्रीडा संकुल मरारटोली गोंदिया येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन सिमा पाटणे नायब तहसिलदार, श्रुती डोंगरे युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र, श्रीमती चेतना ब्राम्हणकर, जिल्हा संघटक गोंदिया भारत स्कॉउट्स गाईड, कुंदा निनावे मॅनेजर, भाग्यश्री गाढे सीईओ दि. महिला अर्बन बॅक गोंदिया, एन एस. उईके राज्य क्रीडा मार्गदर्शक, धनंजय भारसाकडे, विशाल ईश्वरकर, विनय डोंगरवार प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी योग क्षेत्रात विशेष कामगीरी करणारे खेळाडू अथर्व दीपक परमार, ओजस्वी परमार, भार्गव सुनिद्र मेश्राम यांना स्मृतीचिन्ह देवुन व माधुरी परमार योग व निसर्गपोचार तज्ञ यांचा ङ्गयोगाचार्य अवार्डफ देवून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाअंतर्गत योग प्रशिक्षिका माधुरी वानकर (परमार) यांना कॉमन प्रोटोकालनुसार योगाचे प्रात्यक्षिके सादर केली. सदर कार्यक्रमात सरासरी २०० योगपटू सहभागी झालेले होते. कार्यक्रमाचे संचालक ए. बी. मरसकोले क्रीडा अधिकारी यांनी केले तर उपस्थितांचे आभार एन. एस. उईके राज्य क्रीडा मार्गदर्शक यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता शिवचरण चौधरी, विनेश फुंडे, ऋतुराज यादव, नरेंद्र कोचे, शेखर बिरणवार, सुमितकुमार सुर्यवंशी, जयश्री भांडारकर यांनी अथक प्रयत्न केले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# ईडीच्या कारवाईविरोधात गोंदियात काँग्रेसचे रास्तारोको आंदोलन




**गोंदिया:-** काँग्रेस नेते राहुल गांधी यांची नॅशनल हेराल्डप्रकरणी सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने केलेल्या चौकशीचा निषेध नोंदवण्यासाठी शुक्रवारी (१७ जून) गोंदिया जिल्हा काँग्रेसच्यावतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले.आंदोलनानंतर पोलिसांनी काँग्रेस कार्यकर्त्यांची धरपकड करुन गोंदिया शहर पोलिस ठाण्यात नेले.

काँग्रेसच्या वतीने कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले. केंद्रातील मोदी सरकार सूडबुद्धीने चौकशीच्या नावाखाली काँग्रेस व गांधी कुटुंबाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांनी हे कृत्य त्वरित थांबवावे, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली. तसेच १५ जून रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या दिल्ली येथील मुख्यालयात बेकायदेशीर घुसून काँग्रेसच्या नेत्यांना दिल्ली पोलिसांनी मारहाण केली. याचाही यावेळी निषेध नोंदवण्यात आला. जिल्हा काँग्रेस कमिटी,महिला काँग्रेस, सेवादल, युवक काँग्रेसने जयस्तंभ चौकात जोरदार निदर्शने केली.

केंद्रातील मोदी सरकारविरोधात जोरदार घो-षणा देत कार्यकर्त्यांनी जयस्तंभ चौकात रस्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी रास्ता रोको करणाऱ्या काँग्रेसच्या नेत्या व कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या आंदोलनात काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड, प्रदेश सचिव अमर वराडे, पी.जी.कटरे, अशोक गुप्ता, माजी जि.प. अध्यक्ष उषा मेंढे, महिला काँगेस अध्यक्ष वंदना काळे, उषा शहारे, जितेंद्र कटरे, संदिप भाटिया यांच्यासह हजारोच्या संख्येत कार्यकर्त सहभागी झाले होते.

# आलेवाडा ग्रामंपचायतीचा भोंगळ कारभार

## मंजुर निधी आलेवाडा ग्रामंपचायतीला व बांधकाम केशोरी ग्रामपंचायतीला, सचिव व सरपंचाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह

**देवरी::-** आलेवाडा गट ग्रामपंचायत ही आदिवासी बहुल अतिदुर्गम भागात येत असल्याने आदिवासी उपाय योजना योजनेअंतर्गत गट ग्रामपंचायत आलेवाडा अंतर्गत येत असलेल्या मौजा मोहगाव करिता रस्ते, पूल बांधकामाकरिता रुपये १४ लाख ६१ हजार १५३ चा निधी मंजूर करण्यात आला. परंतु, आलेवाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच व सचिव यांनी आलेवाडा ग्रामपंचायतीचा निधी दुसऱ्याच ग्रामपंचायतीवर खर्च केल्याने त्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण केल्या जात आहे.

सविस्तर वृत्त असे की, आदिवासी उपाय योजना योजनेअंतर्गत गट ग्रामपंचायत आलेवाडा अंतर्गत येत असलेल्या मौजा मोहगाव करिता रस्ते, पूल बांधकामाकरिता रुपये १४ लाख ६१ हजार १५३ चा निधी मंजूर करण्यात आला व सदर बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट ग्रामपंचायत सचिव स्तरावर देण्यात आल्याचे बांधकाम स्थळी लावण्यात आलेल्या फलकावरून कळते. गावकऱ्यांच्या तक्रारीवरून सदर मंजूर निधी ही गट ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या मौजा मोहगाव हद्दीत खर्च न करता गट ग्रामपंचायत केशोरी अंतर्गत येणाऱ्या मौजा निलज गावच्या हद्दीत खर्च करण्यात आ-लेला आहे. आणि तो कोणत्या नियमाने खर्च केला? असा प्रश्न सर्व सामान्यानां पडला आहे. या भोंगळ कारभाराची व झालेल्या कामाची बाब गावकऱ्यांच्या लक्षात आल्याने संपूर्ण मोहगाव वाशी एकत्रित येऊन सदर कामाची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे. या दोषी अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.



**मी आलेवाडा ग्रामपंचायतीचा सदस्य असून मला सदर कामासंदर्भात कोणतीही माहिती नाही. सरपंच व सचिव यानी कुणालाही विश्वासात न घेता या कामाची अफरातफर केली आहे. यात माझा कोणताही हस्तक्षेप नाही.**
**जैनसिगं कोराम,** ग्रामपंचायत सदस्य आलेवाडा

**मी आलेवाडा ग्रामंपचायतला सचिव पदावर सहा महिन्या अगोदरच रुजु झालो. सदर कामाची पाहनी केली,काम पुर्णत्वात असल्यामुळे रुपये अकरा लक्ष रुपयाचे बिलाची उचल ग्रामपंचायतने केलेली आहे.**
**चेतना नंदरधाने,** ग्राम पंचायत सचिव

**आलेवाडा ग्रामंपचायतच्या सचिव व सरपंच यानीं आलेवाडा ग्रामपंचायत हद्दीतील मोहगावला मंजुर झा-लेली निधीचा गैर वापर करत दुसर्याच ग्रामपंचायतला बांधकाम केला. व त्यानी पैस्याचीही उचल करुन गाव विकासाच्या निधीची अफरातफर केली आले. त्या दोन्ही पदाधीकार्यावर योग्य ती कार्यवाही होने गरजेची आहे.**
**चरनदास शहारे,**गावातील नागरिक

# ९८ अंशत:अंध मुलांना लार्ज प्रिंटची पाठ्यपुस्तके वाटप

**गोंदिया:** डोळ्याची दृष्टी कमी झाल्याने सामान्य पाठ्यपुस्तके वाचनात अडचणी निर्माण होतात.ज्या मुलांची दृष्टी कमी झालेली आहे. त्यांना त्यांच्या दृष्टी आवश्यकतेनुसार मोठ्या अक्षराची पाठ्यपुस्तके शासनाच्या बालभारती या पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाकडून तयार करून दिल्या जातात.अशा जिल्ह्यातील अंशतः अंध असलेल्या ९८ दिव्यांग मुलांना येत्या शैक्षणिक वर्षासाठी पुस्तकाचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी ही सर्व मुले या पाठ्यपुस्तकांचा वापर करणार आहेत.समग्र शिक्षाच्या समावेशित शिक्षण,दिव्यांग विभागामार्फत विविध योजना अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या आणि इयत्ता १ ली ते १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता विविध योजना राबविण्यात येतात.अशा मुलांना त्यांच्या दृष्टी क्षमतेनुसार व गरजेनुसार मोठ्या अक्षरात पुस्तके छपाई करुन दिली जातात.या मुलांमध्ये गोंदिया तालुक्यातील १२, तिरोडा ९, आमगाव १६, सालेकसा १३, गोरेगाव १२, सडक/ १२, अर्जुनी मोरगाव १७ तर देवरी ७ अश्या एकूण ९८ मुलांचा सहभाग आहे.

## मॉडेल कॉन्व्हेंट एन्ड विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा तुषार ठाकरे तालुक्यात प्रथम



**गोरेगाव:** शुक्रवारला जाहीर झालेल्या वर्ग १० विच्या निकालात गोरेगाव येथील मॉडेल कॉन्व्हेंट व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने उत्तम निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या विद्यालयाचा विद्यार्थी तुषार नेवालाल ठाकरे याने ९६.४०% टक्के गुण प्राप्त करीत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.तर कु.यादवी महेशकुमार चौधरी ९४.६०% हिने तालुक्यात व्दितीय क्रमांक पटकावला आहे.

मानसी दिनेश रहांगडाले ९३.००% गुण घेवून तृतीयस्थानी यश संपादन केले आहे. एकूण ४१ विद्यार्थी परीक्षेला बसले, त्यापैकी ३१ विद्यार्थी प्राविण्य श्रेणी, १० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शाळेचा १००% टक्के निकाल लागला असून प्राविण्य प्राप्त विध्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक आर.डी.कटरे, प्राचार्या सौ. छाया पी.मेश्राम, सौ.एस.आर.कटरे, कु.एस.डी.चिचामे यांच्याकडून पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उज्वल यशाचे श्रेय प्राचार्य व सर्व शिक्षक वृंद यांना दिले. सर्व यशस्वी विध्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक, प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद व इतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

## पी.डी.राहांगडाले विद्यालयाचा १०० टक्के निकाल, मृणाली बिसेन प्रथम

**गोरेगाव:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या वर्ग १० वीच्या परीक्षेचा आज जाहीर करण्यात आलेल्या निकालात विद्यार्थ्यांनी शाळेची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादित केले आहे. शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून एकूण ९८ विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी २५ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, ४९



विद्यार्थी प्रथम श्रेणीत,२४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतून प्रथम क्रमांक कु.मृणाली हेमंत बिसेन, द्वितीय कु.राशी लिलाधर बिसेन, तृतीय क्रमांक कु.तृप्ती ओमप्रकाश बघेले, व निधी जिवनलाल भगत यांनी पटकावला आहे. सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ टी पी येळे , सचिव एड.टी.बी.कटरे, संचालक यु.टी.बिसेन, मुख्याध्यापक सी.डी.मोरघडे, पर्यवेक्षक वाय.आर.चौधरी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

## परशुराम विद्यालय मोहगाव (बु.)चा निकाल ९४.२२ टक्के



**गोरेगाव:-** महाराष्ट्र राज्य परिक्षा मंडळाच्यावतीने मार्च २२ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी परिक्षेचा निकाल जाहिर झाला असून तालुक्यातील परशुराम विद्यालय मोहगाव बु. चा निकाल ९४.२२ टक्के लागला आहे.एकूण विद्यार्थी ६० पैकी परिक्षेला ५८ बसले व ५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात प्राविण्य श्रेणीत १३, प्रथम श्रेणी २६, व्दितीय श्रेणीत १५ व तृतीय श्रेणी ०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाला असून विद्यालयातून शाहील टेंभरे या विद्यार्थ्याने ८४.८० टक्के गुण प्राप्त करीत प्रथम क्रमांक पटकावला. तर तृप्ती पारधी ८३.२० टक्के व्दितीय, समीर टेंभरे ८३ टक्के व प्रगती रामटेकेने ८३.०० टक्के गुण प्राप्त करीत सयुंक्त तृतीय क्रमांक पटकावला. प्राविण्य प्राप्त व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बी.डब्लु. कटरे,स.शि.व्ही.एस.मेश्राम, टी.एफ .ईडपाचे, श्रीमती.भारती कटरे, कु.ममता गणविर, के.बी.पारधी हे उपस्थित होते.

# आर.आर.(आबा)पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना

**गोंदिया:** राज्यातील सर्व भागातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजनेच्या निकषात व स्वरुपात बदल करुन राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीस योजनेत सहभागी होण्याची समान संधी उपलब्ध होईल अशा पध्दतीने पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजनेचे रुपांतर करुन स्मार्ट ग्राम योजना सुरुवात करण्यात आली. गोंदिया जिल्ह्यातील शंभरटक्के ग्राम पंचायतींनी या योजनेत हिरीरीने भाग घेऊन योजनेची यशस्वी व प्रभावी अंमलबजावणी करावी. त्यासोबतच मागील निवड झालेल्या तालुका व जिल्हा स्मार्ट ग्राम ग्राम पंचायतींनी आपले सातत्य टिकवून ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीने प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले आहे.

**जिल्ह्यातील शंभर टक्के ग्रामपंचायतींनी या योजनेत हिरीरीने सहभाग घ्यावा**

या योजनेची स्पर्धात्मक सुरुवात २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून करण्यात येऊन राज्यातील ग्रामपंचायतींना त्यांच्या क्षमतेनु-सार, शासनाच्या विविध योजनेची अंमलबजावणी करुन स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपारिक ऊर्जा व पर्यावरण आणि पारदर्शकता व तंत्रज्ञान यांचा वापर अशा बाबींवर गुणांकनाच्या आधारे सुंदर गाव ग्रामपंचायतीची निवड करुन जिल्हास्तर व तालुकास्तर असे पुरस्कार देण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

ग्रामविकास विभागाच्या २० मार्च २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये स्मार्ट ग्राम योजनेस आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना असे नाव देण्यात आले असून या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सु-धारणा करण्यात आली आहे. १ जुन पासून सुरवात करण्यात येऊन आर. आर. पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्य १६ फेब्रुवारी २०२३ रोजी तालुका व जिल्हा सुंदर गाव ग्रामपंचायतींना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

# जाती दावा पडताळणीचे अर्ज ऑफ लाईन सुद्धा जमा करावे-राजेश पांडे

**गोंदिया:** सन २०२२-२३ या सत्रात व्यावसायिक शिक्षण प्रवेश प्रक्रियेमध्ये (सीईटी, निट, एनटीए सारख्या) सहभाग घेऊन अभियांत्रिकी, वैद्यकीय, फॉर्मसी, अध्यापन पदवी या सारख्या, अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेवू इच्छिणारे विद्यार्थी यांचे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया येथे अर्ज स्विकारण्यात येत असुन जात प्रमाणपत्र पडताळणी करीता अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी वेळेच्या आत ऑफलाईन पध्दतीने आपले अर्ज कार्यालयात जमा करावे असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया राजेश शा. पांडे यांनी केले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी राज्य सामाईक प्रवेश परी-क्षेचे माध्यमातून आरक्षित जागेवर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी नियमानुसार समितीकडे अर्ज केल्यानंतर सामान्यत: ३ महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र बाबत समिती निर्णय घेते. वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी समितीस पुरेसा अवधी मिळावा तसेच जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेपासून वंचित राहू नये. तसेच ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अद्याप पर्यंत वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज सादर केलेला नाही त्यांनी ज्या जिल्हयातून जातीचा दाखला प्राप्त केलेला आहे व ज्यांचे मानीव दिनांक पुर्वीचे जातीच्या प्रवर्गानुसार (अनु. जाती करीता १० ऑगस्ट १९५०, विजा भज करीता २१ नोव्हेंबर १९६१ व इमाव तसेच विमाप्र करीता १३ ऑक्टोंबर १९६७ ही मानीव दिनांक) मानीव दिनांकापुर्वीचे, लगतचे जात नोंदीचे व अधिवासाचे पुरावे आहेत, त्या जिल्हयाच्या जात प्रमाणपत्र समितीकडे वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी त्वरीत अर्ज करावा असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदियाचे उपायुक्त तथा सदस्य राजेश शा. पांडे यांनी केले आहे.

# जि.प.उपाध्यक्ष गणविरांची केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट

**अर्जुनी मोरगाव** : तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरीला जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर यांनी आपल्या शिष्टमंडळासह शनिवार(दि.१८) अचानक भेट देत पाहणी केली.तसेच आरोग्य केंद्रातील समस्यांची जाणीव करुन घेतली. भेटीदरम्यान रूग्णालयात दाखल असलेल्या रूग्णांशी हितगुज साधले.तसेच त्यांना योग्य औषधोपचार करण्याची सुचना उपस्थित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिली. यावेळी योगेश नाकाडे, दिनदयाल डोंगरवार उपस्थित होते.

यावेळी रूग्णालयातील औषधांचा साठा तपासणी,बाह्य रूग्ण व आंतररुग्ण विभागाची तपासणी करण्यात आली. याप्रंसगी वैद्यकीय अधिकारी डॉ पिंकुजी मंडल, डॉ.राहुल कापगते, डॉ.नितु पारधी व वैद्यकीय सेवा देणारे कर्मचारी उपस्थित होते.



# चिरचाळबांधच्या हरिहरभाई पटेल हायस्कुलचा निकाल ९१ टक्के





**आमगाव:-** राज्य परिक्षा मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या तालुक्यातील हरिहरभाई पटेल हायस्कूल चिरचाळबांधचा इयत्ता १० वी परिक्षेचा निकाल ९१.१७ टक्के लागला असून ९३ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.तर २७ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ४२ विद्यार्थी द्रितिय श्रेणीत उत्तीर्ण झाले.शाळा स्तरावर अनमोल योगराज टेंभरे (९३.८०%) गुण मिळवून प्रथम आला. तर रोहित राज-कुमार चौधरी (९१.२०%) व्दितीय, मुस्कान योगराज टेंभरे (९०.२०%) तृतीय आली. त्याप्रमाणे नंदिनी अजय चौधरी (८९.४०%), सुजल हटवार (८९.२०%), रोशनी मेश्राम (८९.००%), करिष्मा लांजेवार (८८.८०%), गुणेश्वर येरप-डे (८७.८०%) या विद्यार्थ्यानीही श्रेणीत स्थान मिळविले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन जगत कल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगतराम रहांगडाले, सचिव नारायणराव येळे, उपाध्यक्ष सौ.सी.एन.येळे, सहसचिव सौ.विमलताई रहांगडाले, कोषाध्यक्ष डॉ.सचिन रहांगडाले, प्राचार्य ओ.टी.चौधरी, ज्यु.कॉ.प्रभारी आर.एच. बांदरे, हाय. प्र.बी.व्ही. शहारे, उच्च माध्यमिक व माध्यमिक, मिडल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

### सितेपारच्या छत्रपती विद्यालयाचा १०० टक्के निकाल, रोहीत बिसेन प्रथम

**आमगाव:** म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पूणे अंतर्गत नागपूर विभागीय बोर्ड नागपूरच्या वतीने, मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेचा निकाल लागला असून तालुक्यातील छत्रपती विद्यालय सितेपारचा निकाल १०० टक्के ला-गला आहे. येथील ५४ विद्यार्थ्यापैकी



५४ विद्यार्थी उतिर्ण झाले. यात ३७ प्रविण्य प्राप्त विद्यार्थी १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ०२ विद्यार्थी द्रितिय श्रेणीत आले. विद्यालयातून रोहित देवराव बिसेन (९१.८०%) हा विद्याथी प्रथम आला. तर कु. तृप्ती ढालचंद हरिनखेडे (८८.८०%) व्दितीय, विकास दिनेश कावळे (८८%) तृतीय आला.त्याचप्रमाणे कु. दुर्गेश्वरी सोयेंद्र बिरनवार (८७%),. कोमल दिलेश्वर मेश्राम (८६.८०%), कु. दिपल आसाराम चौधरी (८६.८०%), कु.कंचन हंसराज रिनाईत (८६.२०%), जयकुमार हौसलाल बरैय्या (८५.८०%), तेजराम बलाराम गौतम (८५.८०%), कु. आचल धनलाल पटले (८५.६०%), कु. साक्षी घनश्याम बिसेन (८५.४०%) या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संत गाडगे महाराज शिक्षणसंस्था सितेपार संस्था अध्यक्ष श्रीमती चौधरी, मा.चौधरी (कार्यवाह) तसेच संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

### एक्युट पब्लिक शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली

**गोंदिया:** मागील अनेक वर्षापासून एक्युट पब्लिक शाळेचा निकाल सतत १०० टक्के लागत आहे. १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत उंच भरारी घेतली. मोनाली रहांगडाले या विद्यार्थिनीने ९४.४० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर अपूर्व भास्कर या विद्याथीनीने ९०.६० टक्के गुण प्राप्त करून द्रितीय क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच मनीष भोयर या विद्यार्थ्याने ८७.८० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.तसेच हिमांशू नागपुरे या विद्यार्थ्याने ८७.२० टक्के गुण प्राप्त करून चतुर्थ क्रमांक प्राप्त केला आहे. आणि गुंजन चौरासिया या विद्याथीनीने ८६.२० टक्के गुण प्राप्त करून पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे.

एक्युट पब्लिक शाळेचा शैक्षणिक दर्जा सातत्याने उंचावीत आहे. त्यामुळे विद्यार्थीही उंच भरारी घेऊन उच्च शिक्षणासाठी झेप घेत आहेत.विशेष म्हणजे या शाळेतून ९ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्याहून अधिक गुण प्राप्त केले आहे. तर उर्वरित सर्व विद्यार्थ्यांनी सुद्धा प्राविण्य यादीत स्थान प्राप्त केले आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष श्रीमती गीताताई भास्कर, सचिव संजयकुमार भास्कर, सहसचिव श्रीमती शुभाताई शहारे तसेच शाळेचे प्राचार्य अमितकुमार, मुख्याध्यापिका श्रीमती उज्वला पारधी, पर्यवेक्षक श्री प्रविणकुमार मेश्राम, शिक्षक कुमारी ललिता कुथे, कुमारी रागिणी शाहू, कुमारी विद्या कोरे, श्रीमती माधुरी मेश्राम व सर्व शिक्षकगण आणि आई वडिलांना दिले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संज्योत बहुउद्देशिय शिक्षण संस्थेने उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### आदिवासीबहुल नक्षल भागातील ककोडी जि. प. शाळेचा १००% टक्के निकाल

**ककोडी:-** म. रा . माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अंतर्गत विभागिय बोर्ड नागपुरच्या वतीने मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी च्या परीक्षेत ककोडी जि.प.हायस्कुल शाळेचा १००% टक्के निकाल लागला.आदिवासी भागातील अतीसंवेदनशील नक्षल क्षेत्रातुन तालुक्यातील एकमात्र जि.प. हायस्कुल ककोडीच्या शाळेचा १००% टक्के निकाल लागला. परिक्षेला एकुण ५५ विद्यार्थी बसले होते. परिक्षेत विशेष प्राविण्यासह ०७ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २३ विद्यार्थी, व्दितीय श्रेणीत २० विद्यार्थी तर ०५ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उतीर्ण झाले.विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्यधापक ए.व्ही. मेश्राम, बिरणवार, अक्षय उकणकर, श्री.ऊके, कु.प्रिती अच-त्रा, श्री. पटले, श्री.लाडे, श्री.चौहाण व श्री.कोटागंले यांच्यासह देवरीचे गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे यांचे विशेष मार्गदर्शन राहिले.सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.


# ग्रामपंचायत कार्यालय महालगांव

## पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया

क्र.ग्रा.पं.महाल/निविदा/ /2022 दि.17/06/2022

## निविदा सुचना क्र. 1 (पहिली वेळ) सन 2022-23

ग्रा.पं.कार्यालय महालगांव, पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया सन 2022-23 या वर्षात १५ वित्त आयोग अंतर्गत १) वाढीव पाईप लाईन चे काम २)सिमेंट नाली दुरुस्ती ३) नविन हातपंप बांधकाम ४) नळ जोडणी व वाढीव पाईपलाईन व स्वच्छ भारत मिशन योजनेअंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन कामे करण्याकरीता दोन लिफाफा पद्धतीने 01 टक्केवारी दराने आफलाईन निविदा नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून मागविण्यात येत आहे. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निविदा बाबत ईतर सविस्तर माहिती ग्रा.पं.कार्यालय महालगांवचे सुचना फलकावर उपलब्ध आहे.

### निविदेचे वेळापत्रक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | निविदा प्रसिद्धी दिनांक | 18/06/2022 | निविदा प्रपत्र फी-500/- | अनामत रक्कम भरणा करणे:- ग्रा.पं.कार्यालय महालगांव खाते क्रमांक 97790100018924 बँकेचे नाव-बँक ऑफ बडोदा शाखा अर्जुनी/मोर IPSC CODE-BARBODBARIN या खात्यावर किंवा ग्रा.पं. महालगांव येथे रोखीने भरणा करणे. |
| 2 | निविदा ऑफलाईन भरणा करण्याची दिनांक | 18/06/2022 ते 25/06/2022 सायं.5.00 वा.पर्यंत | | |
| 3 | ऑफलाईन निविदा उघडण्याचा दिनांक | ग्रा.पं.महालगाव 26/06/2022 | | |
| 4 | निविदा भरणा पूर्व बैठक | 17/06/2022 | | |

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत महालगांव**

**सरपंच**
**ग्रामपंचायत महालगांव**



# महाराष्ट्र शासन
# गोंदिया वन विभाग
# जाहीर सुचना

जाहीर करण्यात येत आहे की, श्रीमती मोहीनी प्रदीप निंबार्ते रा. लक्ष्मी निवास, कामठा रोड, बनगांव ता.आमगांव जि.गोंदिया यांनी ठाणे वनविभागात आलेले लक्ष्मी सॉ मिल, एल.बी.एस.रोड, विक्रोळी, ता.जि.ठाणे वेस्टर्न इंडिया पेपर मिल समोर, सुरजी वल्लभदास चाळ नं.2 समोर, एल.बी.एस.मार्ग, विक्रोळ (प) मुंबई-400083 येथील स्थापित असलेली लक्ष्मी सॉ मिल आरागिरणी परवाना क्रमांक (370/1989) ID No.MH1888THTH (36 इंच उभा 1 नग एकुण 1 नग) मशीनसह परवाना धारक श्रीमती, सावित्रीदेवी गंगाराम पटेल, रा.एल.बी.एस.रोड, (प) मुंबई-440083 यांचे कडून खरेदी केल्याने सदर आरायंत्र परवाण्यासह अर्जदार श्रीमती, मोहीनी प्रदीप निंबार्ते, याचे मालकी गट क्र. प.ह.नं.13, गट नं. 166 या ठिकाणी नामांतरण/हस्तांतरण/पुनर्स्थाननिश्चयन करण्याबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे.

करीता सदर आरागिरणी परवान्याचे अर्जदार याचे नांवे नामांतरण/हस्तांतरण व स्थानातरण/पुनर्स्थाननिश्चयन करणेबाबत कोणाचा अधिकार अथवा आक्षेप असल्यास त्याबाबत लेखी निवेदन संबंधित दस्ताऐवजाच्या पुराव्यासह उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग, गोंदिया यांचे कार्यालयास जाहिरात प्रकाशित झाल्याचे दिनांकापासून 15 दिवसाचे आत सादर करावे. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल, तद्नंतर कोणतीही तक्रार, आक्षेप स्विकारल्या जाणार नाही.

**उपवनसंरक्षक**
**गोंदिया वनविभाग गोंदिया**

माहिती-नाग./१८९/२०२२

# बांठिया आयोगाला तपशिलासाठी मुदतवाढ




**नागपूर :** आडनावावरुन ओबीसींचा इम्पिरिकल डेटा (शास्त्रीय सांख्यिकी तपशील) गोळा करण्यात वेळ घालवल्यानंतर आता समर्पित आयोगाला पुन्हा जात आणि प्रवर्गनिहाय डेटा गोळा करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ मिळाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे राज्य सरकारने स्थापन केलेल्या समर्पित आयोगाची मुदत ११ जून २०२२ रोजी संपत होती; परंतु राज्यातील मागासवर्गाच्या (इतर मागासवर्गाच्या) सखोल चौकशीसाठी आणखी वेळ लागणार असल्याचे आयोगाने कळवल्यावर शासनाने या आयोगाला एक महिने म्हणजे ११ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे राज्य शासनाने राज्याचे मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला. आयोगाने राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी विविध भागांत जाऊन या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना व नागरिकांची निवेदने स्वीकारली.

राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती आणि शहरातील महापालिका, नगरपालिका आणि नगर पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती) आरक्षण देण्यासाठीच्या चौकशीसाठी हे आयोग काम करत आहे. आयोगाला आणखी कालावधी लागणार असल्याचे शासनाला कळवण्यात आल्यावर एक महिना मुदतवाढ देण्याचे आदेश शासनाने १७ जूनला काढले.

## धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून द्या; खासदार मेंढे यांची केंद्रीय सचिवांशी भेट

**गोंदिया :-** राज्य शासनाच्या चुकीच्या माहितीच्या आधारावर भंडारा, गोंदिया जिल्ह्याला दिलेले रब्बी धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात यावे या मागणीसाठी खासदार सुनील मेंढे यांनी सार्वजनिक वितरण विभागाचे केंद्रीय सचिव सुधांशू पांडे यांची भेट घेतली. त्यावर लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे पांडे यांनी आश्वासन दिले.



मागील चार दिवसांपूर्वीच भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील धान खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आणि असंतोषाचे वातावरण आहे. राज्य शासनाने पेरणीच्या दिलेल्या चुकीच्या आणि अपूर्ण माहितीमुळे केंद्राकडून राज्याला धान खरेदीचे उद्दिष्ट दिले गेले. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमिवर खासदार सुनील मेंढे यांनी दिल्ली येथे जाऊन सार्वजनिक वितरण विभागाचे सचिव सुधांशू पांडे यांची भेट घेतली व वास्तविक परिस्थिती समजावून सांगितली.राज्य सरकारने दिलेल्या चुकीच्या व अर्धवट माहितीवर केंद्राने रब्बी हंगाम २०२२ साठी २७ लाख ५० हजार क्विंटल राज्याला धान खरेदीचे उद्दिष्ट दिले. दिलेले अत्यंत कमी उद्दिष्ट चार दिवसांपूर्वीच पूर्ण झाल्याने शेतकरी अडचणीत आला आहे, असे खा.मेंढे यांनी सांगितले.

२०२०-२१ मध्ये पेरणी क्षेत्र हे १,१८,२०६ हेक्टर होते. त्यावेळी राज्याने ५३ लाख १४ हजार ७६० क्विंटलचे धान खरेदी केले. मात्र २०२१-२२ मध्ये पेरणीचे क्षेत्र १,२९,०२९ हेक्टर असतानाही खरेदीची उद्दिष्ट मात्र २७ लाख ५० हजार क्विंटल दिले गेले. जे मागील वर्षीपेक्षा जवळपास अर्ध्याने कमी आहे. हा विरोधाभास असून राज्य शासन आणि पाठविलेल्या चुकीच्या माहितीमुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळे २०२१-२२ चे पेरणी क्षेत्र आणि २०२०-२१ मध्ये झालेल्या खरेदीची आकडेवारी लक्षात घेता भंडारा-गोंदिया जिल्ह्यासाठी धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात यावे, अशी मागणी खासदार सुनील मेंढे यांनी यावेळी केली. लवकरच याबाबत सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन पांडे यांनी दिले.

## "दिशा"च्या सभेला राजकीय व्यक्तींची उपस्थित




**गोंदिया:** केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी, प्रगती व सनियंत्रण करण्यासाठी "जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती' (दिशा) आहे. प्रत्येक तीन महिन्यांतून एकदा समितीच्या बैठकीचे आयोजन करणे अपेक्षित आहे. यामुळे विविध योजनांच्या अंमलबजावणीस गती मिळणार अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही. जिल्हा विकास व सनियंत्रण समितीची सभा खासदार अशोक नेते यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार १४ जून रोजी पार पडली. निमंत्रीत तथा आमंत्रित सदस्यांनाच सभेला उपस्थित राहून सूचना मांडाव्या लागतात. विशेष म्हणजे या सभेला निमंत्रीत, आमंत्रित सदस्यांऐवजी अन्य राजकीय व्यक्तींनीच समस्या उपस्थित केल्या. परिणामी निमंत्रित व आमंत्रित सदस्यांना वेळ कमी मिळाला तर काही सदस्यांना समस्या मांडण्याची संधीच मिळाली नसल्याचे बोलले जाते.

केंद्र शासनाची महात्मा गांधी रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, पंतप्रधान कृषी सिंचन योजना, स्मार्ट सिटी अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, पंतप्रधान कौशल्य विकास योजना, एकात्मिक बालविकास योजना, पंतप्रधान उज्ज्वला योजना, दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती अभियान, सामाजिक साह्यता कार्यक्रम यासह विविध २९ योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयामार्फत राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय दक्षता व सनियंत्रण समितीची स्थापना केली आहे.

या समितीचे रुपांतर आता जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीत करण्यात झालेले आहे. समितीत अध्यक्षपदी लोकसभेतील वरिष्ठ सदस्य, जिल्ह्यातील इतर लोकसभा सदस्य व राज्यसभा सदस्य हे सहअध्यक्ष, जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव, विधानसभा सदस्य हे सदस्य, सर्व नगरपालिकांचे अध्यक्ष, ग्रामपंचायतींचे पाच सदस्य, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामविकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, नामवंत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, अग्रणी बँकेचा प्रतिनिधी, डाक कार्यालयाचे वरिष्ठ अधीक्षक, या समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या विविध योजनांचे जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी हे सदस्य असतात.

मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात खासदार अशोक नेते यांच्या उपस्थितीत समितीची सभा पार पडली. सभेत जनसामान्यांच्या समस्या आणि केंद्र सरकारद्वारे सुरू असलेल्या योजना संबंधातील अडचणी व समस्या आमंत्रित, निमंत्रित सदस्यांनी मांडणे अपेक्षित होते. परंतु मंगळवारच्या सभेत राजकीय पक्षाचे पुढारी व नेतेमंडळी यांनी उपस्थिती दर्शवून त्यांनी समस्या मांडल्या. यामुळे समितीच्या सदस्यांना जनसामान्यांच्या समस्या मांडण्याची संधी मिळाली नाही, हे तर समितीच्या सदस्यांचे अधिकाराचे हनन असल्याचे बोलले जाते. ते विशेष म्हणजे या सभेला सामान्य नागरिक किंवा समितीच्या सदस्य नसलेल्या व्यक्तीला उपस्थित राहता येत नाही. पुढील तीन महिन्यानंतर होणाऱ्या सभेला सनियंत्रण समितीच्या अध्यक्ष, सचिव व सदस्यांनी याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

दर तीन महिन्यांनी होणाऱ्या सभेला प्रत्येक विभागाच्या विभाग प्रमुखांनी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. परंतु मंगळवारी पार पडलेल्या सभेला तब्बल १५ विभाग प्रमुख अनुपस्थित होते.ते नियमानुसार सभेला अनुपस्थित राहणाऱ्या विभाग प्रमुखांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाई होणे अपेक्षित आहे.

### प्रगतीशील शिक्षण संस्थेची कार्यकारिणी गठीत

**गोंदिया :** स्थानिक प्रगतीशील शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी सुरेश भक्तवर्ती, उपाध्यक्षपदी शिशिर कटरे तर सचिवपदी किशोर भगत यांची निवड करण्यात आली. सन २०२२ ते २०२७ या कार्यकाळासाठी निवडणूक निर्णय अधिकारी प्राध्यापक संजय रहांगडाले यांच्या मार्गदर्शनात कार्यकारिणीची बिनविरोध निवड पार पडली. कार्यकारिणीत कुमराज चव्हाण, युगराज सोनवाने, सौ. डॉ. छाया पटले, सौ. चेतना चव्हाण, सौ. सोनाली रहांगडाले, विना चौधरी, दुर्गा ठाकरे, छत्रपाल चौधरी यांची निवड करण्यात आली.

## काँग्रेसचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



**गोंदिया:**अग्निपथ योजनेला घेवून देशभर आंदोलन होत आहे. कोणताही निर्णय घेताना विश्वासात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने योजनेवर विचार करून योजना परत घ्यावी, अशी मागणी गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदन देताना काँग्रेस कमिटीचे प्रदेश सचिव अमर वराडे., युवक काँग्रेस अध्यक्ष राजकुमार(बाबा) बागडे, माजी अध्यक्ष आलोक मोहंती, नीलम हलमारे, अमर राहुल, विजेंद्र बारुंडे, मजहर पठान, मनीष चौहान, अमन तिगाला, राजू गिल, मंथन नंदेश्वर व इतर पदाधिकारी व काँग्रेस कार्यकर्ता उपस्थित होते.

## ओबीसीच्या वतीने लोकप्रतिनिधींना जवाब दो आंदोलन



**यवतमाळ :-** राज्य सरकारने निर्माण केलेल्य समर्पित आयोगासमोर कोणत्याही लोकप्रतिनिधीने आपले म्हणणे मांडले नाही ओबीसीच्या आरक्षणाच्या संदर्भात त्यांना फक्त ओबीसीचे मतच पाहिजे का, व इतर काही प्रश्न घेऊन जबाब दो आंदोलन १९ जून रोजी करण्यात आले.

यामध्ये केंद्र सरकारने २०२१ जनगणना का केली नाही ? ओबीसीची जातिनिहाय जनगणना का होत नाही? ओबीसीच्या राजकीय आरक्षणाचा खून कोणी केला? ओबीसींच्या आरक्षणाचे मारेकरी कोण आहेत? ओबीसींना घटनाबाह्य क्रिमीलेअर ची अट का लावली? लोकसंख्येच्या प्रमाणात विधानसभा लोकसभेमध्ये ओबीसींना आरक्षण का मिळत नाही? यवतमाळ जिल्ह्याच्या ओबीसी चेआरक्षण १४ चे १७ झाले आता ते १९ टक्के करण्याकरीता लोकप्रतिनिधी का बोलत नाही? बनावट दाखले काढून पद भूषविणाऱ्या लोकप्रतिनिधींना शासन का केले जात नाही? याशिवाय इतर प्रश्न घेऊन ओबीसी बांधवांनी यवतमाळ येथे खा. भावना गवळी यांचे कार्यालयात, आ. अशोक उईके यांचे कार्यालयात निवेदन दिले.इतर खासदार व आमदार यांचे पीए यांनी निवेदन स्वीकारले.

निवेदन देताना डॉ. ज्ञानेश्वर गोरे अध्यक्ष बीपीएसएस, उपाध्यक्ष ओबीसी जनमोर्चा, विलास काळे उपाध्यक्ष ओबीसी जनमोर्चा, जिल्हा अध्यक्ष प्रमोद राऊत, विदर्भ अध्यक्ष सुनीता काळे, रवी नागरीकर, गजानन गुल्हाने संजय बारी, ॲड. अरुण मेहेत्रे, अशोक मोहुरले, ज्ञानेश्वर रायमल, किशोर बागवाले, विनोद इंगळे, राहुल पाचघरे, अरुण कपिले, प्रा. काशिनाथ लाहोरे, नीता दरणे, माधुरी फेंडर, शैलेश येडे, शशिकांत लोळगे, अनिता गोरे, वैशाली फूसे, प्रा.दीपक वाघ, पवन थोटे , सुरेश वडतकर, अभि. अरुणकुमार सांगळे, संजय राजगुरे, साहेबराव पारध्दे, मोरेश्वर वानरे, वासुदेव खेरडे, शशिकांत फेंडर, मायाताई गोरे संतोष झेंडे आदी ओबीसी बांधव उपस्थित होते.

# वाळूच्या अनियंत्रीत वाहनांमुळे वाढले अपघात

**गोंदिया :** जिल्ह्यात रेती तस्करांचा बोलबाला वाढत चालला आहे. तस्करांचा मुरजोरपणा नागरिकांच्या जीवावर येत आहे. १५ जून रोजी महालगाव येथे रेती घेवून जाणाऱ्या टिप्परने ट्रॅक्टरला धडक दिली. या घटनेला घेवून महालगाव-मुरदाडा येथील नागरिकांनी पोलिस व महसूल प्रशासनाविरूध्द चांगलाच संताप व्यक्त केला. यात रेती तस्कर; प्राणांतिक अपघात आणि त्यानंतर पोलिसांवर हल्ला हे तिन्ही प्रकरण आजघडीला जिल्ह्यात चर्चेचे ठरले आहे. पोलिसांवरील हल्ला प्रकरणातील आरोपींच्या अटकेचा सत्र सुरू झाले आहे तर दुसरीकडे अपघातास कारणीभूत त्या अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई करण्यात आली का? असा प्रश्नही उपस्थित होवू लागला आहे. एंकदरीत या प्रकरणावरून रेती तस्करीला यंत्रणेचा अभयदान कारणीभूत आहे. अशी चर्चा सुरूझाली आहे.



गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रेती तस्करीचा गोरखधंदा सुरू आहे. या तस्करीच्या व्यवसायाला सोयीस्कर महसूल व पोलिस प्रशासन अभयदान देत असल्याचा आरोप गेल्या अनेक दिवसांपासून केला जात आहे. तक्रारीनंतर कसलीही कारवाई होत नाही. उलट कारवाईसाठी गेलेले अधिकारी, कर्मचारी आलबेल दर्शवून अंग काढून घेत आहेत. यामुळे तस्करांचा दबदबा वाढत चालला आहे. अहोरात्र हजारोच्या संख्येत टिप्पर, ट्रॅक्टर रेती वाहतूक करीत आहेत.

त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यावरून ये-जा करणे धोकादायक ठरत आहे. अशातच महालगाव येथे १५ जून रोजी रेती वाहून नेणाऱ्या टिप्परने ट्रॅक्टरला धडक दिली. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला तर चार जण गंभीर जखमी झाले. या प्राणांतिक अपघाताला घेवून रेती तस्करीला अभय देणाऱ्या यंत्रणेविरूध्द नागरिकांनी चांगलाच संताप व्यक्त केला. आंदोलनाची भुमिका स्विकारणाऱ्या काही नागरिकांनी कायदा हातात घेवून पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला चढविला. या प्रकरणात सहभागी असलेल्या आरोपीवर कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र रेती तस्करीला अभय देणाऱ्या यंत्रणेवर कारवाई का होत नाही? असा प्रश्न आजघडीला उपस्थित होत आहे. ज्या टिप्परमुळे अपघात झाला तो टिप्पर अवैधरित्या वाहतूक करीत असताना त्या मालक-चालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला नाही. अशी चर्चा सुरू झाली आहे.

### घाट बंद तरीही रेती पुरवठा सुरू

गौण उत्खननाच्या नियमानुसार पावसाळ्यापूवी रेतीचे उत्खनन बंद केले जाते. यानुरूप ९ जूनपासून जिल्ह्यातील रेती घाट बंद झाले आहेत. असे असले तरी गोंदिया व तिरोडा तालुक्यातील रेती घाटातून रेतीचे उत्खनन सुरू आहे. एवढेच नव्हेतर मोठ्या प्रमाणात वैध, अवैधरित्या रेतीचा पुरवठाही केला जात आहे. हा सर्व प्रकार महसूल व पोलिस प्रशासनाच्या डोळ्यासमोर सुरू असूनही कसलीही कारवाई होत नसल्याची चर्चा सुरूआहे.

### तो टिप्पर एका पोलिस अधिकाऱ्याच्या नातेवाईकाचा

महालगाव येथे घडलेल्या प्राणांतिक अपघातास जबाबदार रेती वाहतूक करणारा टिप्पर चालक आहे. टिप्परने अवैधरित्या रेती वाहतूक केली जात होती. एवढेच नव्हेतर हा टिप्पर एका पोलिस अधिकाऱ्याच्या नातेवाईकाचा असल्याची विश्वसनिय सुत्राकडून माहिती आहे. त्यामुळे हे प्रकरण पोलिस दाबणार तर नाही? असा सवालही उपस्थित होवू लागला आहे

# कवलेवाडा जि.प.क्षेत्रात १.२० कोटींची विकासकामे



**तिरोडा :** तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा जिल्हा परिषद क्षेत्राचे सदस्य म्हणून किरण पारधी हे निवडून येताच त्यांनी १ कोटी २० लाख रुपये खर्चाचे अनेक विकासकामे आणले. यात सिमेंट रस्ता, बंदिस्त नाली, वॉलकंपाऊंड, गट्टू लावणे अशा अनेक कामांचा समावेश आहे. या विविध विकास कामांचे भूमिपूजन सुद्धा जिप सदस्य किरण पारधी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी कवलेवाडा पंचायत समितीचे सदस्य जितेंद्र चौधरी, वासुदेव हरिणखेडे सरपंच मुंडीपार, विकासकामेशकुंतला गजभिये उपसरपंच मुंडीपार, डीलूराम चौधरी सरपंच बेलाटी बु., दर्यााराव रिनाईत पोलीस पाटील बेलाटी, जितेश बोदेले ग्रा.पं. सदस्य कवलेवाडा, वनिता सेलोकर ग्रा.प. सदस्य, संजय पटले, बाबुलाल चौधरी सेवा सहकारी अध्यक्ष, चूंनीलाल चौधरी सेवा सहकारी उपाध्यक्ष, राजेंद्र साठवणे, रंगलाल रहांगडाले, जी.जी. जमाईवार ग्रामसेवक मुंडीपार, दिलीप चौरे, संदीप हरिणखेडे, घनश्याम पटले, शंकर पटले, पुरुषोत्तम रहांगडाले, सुरेंद्र नागपुरे, रुपेश भगत, अनिल पटले, ओमप्रकाश चौधरी, राधेश्याम वाघाडे, राजाराम सोनवणे, परमेश्वर साठवणे, विनोद चौधरी, डूलीचंद साठवणे, मंगला बिसेन परिचर, गुलाब कटरे सरपंच मरारटोला, भीमराव साखरे उपसरपंच, मनोज उपरिकर पोलीस पाटील, नेरकर, चंद्रकुमार झगेकार, इंदल चौधरी रोजगार सेवक आदी उपस्थित होते.

### आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना अर्थसहाय्य योजनेचे तहसीलदारांच्या हस्ते धनादेश वाटप

**अर्जुनी-मोरगाव :** तालुक्यात सततची नापिकी आणि डोक्यावर कर्जाचा डोंगर यामुळे गेल्या काळात पाच शेतकरी आत्महत्या झाल्या. या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक सहायता निधीमधून शासनातर्फे मदत देण्यात आली. तहसीलदार विनोद मेश्राम यांच्या हस्ते शेतकऱ्यांच्या विधवांना धनादेशाचे वितरण तहसील कार्यालयात करण्यात आले.

तालुक्यात पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. यामध्ये सावरटोला येथील आसाराम तुकाराम चचाणे, कानोली येथील मोरेश्वर पंढरी रहिले, परसटोला येथील परसराम येशू हलामी, केशोरी येथील संतोष दयाराम मानकर आणि एरंडी येथील यशवंत बारकू राऊत या शेतकऱ्यांचा समावेश आहे.राज्य शासनाकडून मासिक बचत योजनेच्या माध्यमातून ७० हजार रुपये आणि तीस हजार रुपयांचा धनादेश या स्वरुपात मृतकांच्या वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांची सहायता मंजूर झाली. या सहायता निधीचे वाटप तहसीलदार विनोद मेश्राम यांच्या हस्ते मृतांच्या वारसांना तहसील कार्यालयात वाटप करण्यात आले. यावेळी मृतकांच्या वारसान शारदा चचाने, सुनीता रहिले, गीता हलामी, वंदना मानकर आणि सुमित्रा राऊत उपस्थित होते.

# तीनवर्षात सारस पक्ष्यांच्या संख्येत घट

## महाराष्ट्रात ३७ व मध्यप्रदेशात ४५ सारस पक्ष्यांची नोंद



**गोंदिया:** बालाघाट, भंडारा-गोंदिया जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात आढळणाऱ्या सारस पक्ष्यांचे अस्तित्त्व न्यायालयाच्या सुचनेनंतरही धोक्यात आले आहे. सेवा संस्था आणि वनविभागाने जून महिन्यात केलेल्या गणनेत भंडारा-गोंदिया आणि लगतच्या बालाघाट जिल्ह्यात फक्त ८२ सारस पक्ष्यांची नोंद झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या पक्ष्यांच्या संख्येत ६ ने घट झाली आहे. या पक्ष्यांच्या संर्वधनासाठी वन्यजीव संस्था आणि वन विभागाने पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे. गेल्या तीनवर्षाचा विचार केल्यास सातत्याने सारस पक्ष्यांची संख्या कमी होताना दिसून येत आहे.

सारस गणनेनुसार महाराष्ट्र राज्यात ३७ तर मध्यप्रदेशात ४५ सारस पक्षी आढळले. मागच्यावर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात ४ व मध्यप्रदेशात २ सारसांची संख्या कमी झाली ही चिंतेची बाब ठरली आहे. सारस बचावाकरीता न्यायालयाने निर्देश दिल्यानंतरही मागील वर्षीच्या तुलनेत सारस पक्ष्यांची कमी झालेली संख्या प्रशासनाच्या नियोजनातील अभाव दर्शवणारी ठरली आहे.

सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार तथा सारस संरक्षण प्रकल्प प्रभारी सेवा संस्था सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली ११ ते १३ जून या कालावधीत सारस गणना करण्यात आली. गोंदिया व बालाघाट जिल्ह्यात संस्थेचे सदस्य, स्थानिक शेतकरी व गोंदिया, बालाघाट येथील वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी गणना केली.

### जिल्हानिहाय सारस संख्या

| जिल्हा | २०२२ | २०२१ | २०२० |
| --- | --- | --- | --- |
| गोंदिया | ३४ | ३९ | ४५ |
| बालाघाट | ४५ | ४७ | ५६ |
| भंडारा | ०३ | ०२ | ०२ |
| चंद्रपूर | ०० | ०० | ०१ |

बालाघाट, गोंदिया-भंडारा जिल्ह्याकरिता ४२ चमूंनी सारस पक्ष्यांच्या विश्रांतीस्थळी पोहोचून सकाळी ५ ते १० पर्यंत विविध ठिकाणी गणना केली. सेवासंस्थेसह हिरवळ बहुउददेशिय संस्था, गोंदिया निसर्ग मंडळ, सातपुडा फाउंडेशन इतर संस्थेचे एकुण ९२ स्वंयसेवक, सारस मित्र तसेच गोंदिया वनविभागातील ५० वनकर्मचा-यांनी सहभाग नोंदविला.

बाघ व वैनगंगा नदी महाराष्ट्रातील गोंदिया तसेच मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्याला विभाजित करते. भौगोलिक दृष्टीकोणातून नदीच्या दोन्ही बाजूला जैवविविधतेत समानता पाहिली जाते. सारस पक्ष्यांना भ्रमंतीकरिता किंबहुना विश्रांतीकरिता हे स्थळ योग्य आहे. म्हणूनच जिल्ह्यात सारस पक्ष्यांचा अधिवास टिकून आहे.

गणनेसाठी गोंदियाचे उपवनसरंक्षक कुलराज सिंह, दक्षिण वनविभाग बालाघाटचे मंडल अधिकारी जी.के.वरकडे, जिल्हा पुरातत्व एवं संस्कृती परिषद बालाघाट, हट्टा वनपरिक्षेत्र अधिकारी हट्टा गोविंद मरावी, किरनापूर वनपरिक्षेत्र अधिकारी किरनापुर सुयस पांडे, तिरोडा वनपरिक्षेत्र अधिकारी श्री मून, आमगाव वनपरिक्षेत्र अधिकारी आमगांव श्री.मुचलवार, भगत तसेच वनकर्मचाऱ्यांचे व अन्य स्वंयसेवी संस्थाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

वर्षभरातील सारस पक्ष्यांचे विश्रांतीस्थळ, प्रजनन अधिवास, तथा भोजनासाठी प्रयुक्त भ्रमण याचा अभ्यास केला गेला. सोबतच सारसाचे अधिवास व त्यांच्या आसपास असलेल्या शेतकऱ्यांना सारस पक्ष्याचे महत्त्व सांगण्यात आले. संरक्षण व संवर्धनासाठी प्रेरीत करण्यात आले.सारस संरक्षणासाठी शेतकरी आणि स्वयंसेवी संस्थांसह प्रशासकीय पातळीवर विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांनी सांगितले.




# आता पहिलीपासूनच कृतिशील शिक्षण

- "खेळू, करू, शिकू' उपक्रमातून विद्यार्थी होतील विचारप्रवण
- मराठी, इंग्रजी, गणित विषय एकाच पुस्तकात

**गोंदिया:-** यंदा पहिलीच्या पुस्तकात विद्यार्थ्यांच्या कृतीला आणि विचारांना प्राधान्य देण्यात आले आहे. आगामी शैक्षणिक सत्रात विद्यार्थी कृतिशील घडविण्यावर भर देण्यात आला असून इयत्ता पहिलीसाठी मराठी, गणित, इंग्रजी अशा तिन्ही विषयांचे एकच पुस्तक आहे. त्यामुळे "घोका आणि ओका'' या शिक्षण पद्धतीतून बाहेर पडून विद्यार्थ्यांना "खेळू, करू, शिकू' या कृतिशिल Active learning उपक्रमातून विचारप्रणव शिक्षण मिळणार आहे.

विदर्भात शालेय शिक्षणाचा श्रीगणेशा २७ जून पासून होणार आहे. यंदा पहिल्यांदाच पहिलीचे नवीन पुस्तक विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसाठी एकात्मिक व द्विभाषिक नावाने मराठीच्या तीन विषयांचे एकत्रीकरण असलेल्या चार भागांचे पुस्तक तयार करण्यात आले आहे. तीन महिने एक पुस्तक असे वर्षभर चार पुस्पुतके विद्यार्थ्यांना वापरता येतील. त्यामुळे तीन महिने एकच वही आणि एकच पुस्तक घेऊन विद्यार्थी वर्गात हजर राहतील. त्यामुळे Active learning आपोआपच दप्तराचे ओझे कमी होणार आहे. एकात्मिक दृष्किोनावर आधारित एकात्मिक पाठ्यपुस्तकाची निर्मिती व अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

आर्ट इंटिग्रेटेड आणि स्पोर्ट इंटिग्रेटेड दृष्किोनाचा विचारही पाठ्यपुस्तकात आहे. बालकांमध्ये वय वर्ष आठपर्यंत एकाच वेळी अनेक भाषा शिकण्याची क्षमता असते, ते याचा विचार करून पाठ्यपुस्तकात गरजेनुसार द्विभाषिक दृष्किोन स्वीकारण्यात आला आहे. पुस्तकातील विषयांचा आशय "मी आणि माझे कुटुंब', "पाणी, प्राणी, वाहतूक व आपले मदतनीस' या विशिष्ट विषय सूत्रां भोवती गुंफलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या परिसरातून पाठ्यपुस्तकातील आशय स्पष्ट होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या अनुभवांवर आधारित उदाहरणांसह आशय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी आणि भावविश्वाशी निगडित असलेल्या अनुभवांना आशयाची जोड देऊन आणि चित्रे, रंग यांचा वापर करून पाठ्यपुस्पुतक आकर्षक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या कृतीला आणि विचाराला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक आशय हा अध्ययन निष्पत्तीला जोडण्यात आलेला आहे.

कृती, खेळ, कोडी, चित्रकला, गोष्टी आणि गाणी यांचा उपयोग करून अध्ययन, अध्यापन आनंददायी होण्यासाठीचा प्रयत्न या पाठ्यपुस्तकात केलेला आहे. त्यामुळे पहिलीचे विद्याथी कृतिशील होण्यास मदत होणार आहे.

### पाठ्यपुस्तकात प्रथमच इमोजीचा वापर

**पाठ्यपुस्तकात प्रथमच अनेक प्रतीकांचा (इमोजी) उपयोग करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतीके पाहूनच विद्यार्थ्यांना कोणती कृती करायची याचा बोध होतो. विचारक चाव्या आणि सहा थिंकिंग हॅट्स यांचा वापर करण्यात आलेला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांच्या विचारांना आणि कल्पनांना चालना मिळणार आहे. त्यामुळे इयत्ता पहिलीपासूनच विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, विश्लेषणात्मक विचार, तार्किक विचार, वैज्ञानिक दृष्किोन इत्यादी विकसित होण्यास मदत होणार असल्याचे देवरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे यांनी सांगितले.**

### गाण्यांमधून शिका संख्या

**गणित हा विषय तसा किचकट आहे. परंतु पहिलीच्या पुस्तकात गाण्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संख्या शिकवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचबरोबर काय करायला हवे आणि काय नको, हे चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थी शिकणार आहेत. तसेच रोजच्या ओळखीतल्या वस्तूंवरुन आकडेमोड करणार आहेत. यातून विद्यार्थी कृतशील होण्याबरोबरच अध्ययनात प्रगती करणार असल्याचे दिसून येत आहे. एकाच पुस्तकामुळे विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी होणार आहे. त्यामुळे एकच वही आणि एकच पुस्तक शाळेत त्यांना नेता येईल. पुस्तकात कृतीवर भर असल्यामुळे विद्यार्थी कृतिशील होण्यास मदत होईल, असे केंद्रप्रमुख केदार गोटफोडे म्हणाले.**